# पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित, पिंपरी

मुख्य कार्यालय : शामा आर्केड, स. न. १११ मेन रोड, काळेवाडी, पिंपरी पुणे ४११०१७
फोन न. ७२७६०९६४३१ / ४३४ इमेल: admin@pcsbank.in वेब साईट : www.pcsbank.in

## विशेष सर्वसाधारण सभा सुचना

**(फक्त सभासदांकरिता)**

बँकेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १९ मार्च २०२३ या दिवशी सकाळी ठिक ११.०० वा. बालाजी लॉन्स, काळेवाडी, पिंपरी पुणे ४११०१७ या ठिकाणी खालील विषयांवर चर्चा विनिमय करून निर्णय घेणेसाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस आपण प्रत्यक्ष उपस्थित रहावे, हि विनंती.

### सभेपुढील विषय

१(अ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम ४९ अन्वये बँकेच्या वैधानिक लेखा परिक्षकांनी बुडीत कर्ज म्हणून प्रमाणित केलेली कर्ज खाती बँकेचा वसुलीचा अधिकार अबाधित ठेवणेचे अटीवर मा. सहकार खात्याची सदर निर्लेखानास मान्यता देणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणे

१(ब) संचालक मंडळाने शिफारस केलेली सामोपचार कर्ज परतफेड योजना प्रस्ताव मा. सहकार खात्याकडे मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देणे.

सभेस सर्व माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**मा. संचालक मंडळाचे सुचनेवरून**
**धनंजय मुरलीधर पाटील**
**मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र)**

**स्थळ : पिंपरी, पुणे-१७**
**दिनांक : ११.०३.२०२३**

---

### * विशेष सूचना *

१. बँकेच्या पोटनियम सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणसंख्येच्या (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच दिवशी पूर्व घोषित वेळेनंतर अर्ध्या तासाने घेतली जाईल व त्या सभेस गणसंख्येचे (कोरमचे) बंधन असणार नाही.

२. ज्या सभासदांना सभेच्या विषयांबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी १७ मार्च २०२३ पर्यंत, मुख्य कार्यालय अथवा शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात अर्ज द्यावेत व अर्जांमध्ये सभासद क्रमांक व संपूर्ण नाव नमूद करून पाठवावेत. सभेच्या विषय पत्रिकेतील विषयांबाबतचे प्रश्न विचारात घेतले जातील.

३. सभासदांनी आपले अचुक पत्ते, भ्रमणध्वनी, व्हॉट्सॲप व ई-मेल आय डी बँकेच्या मुख्य कार्यालयात / नजीकच्या शाखेत द्यावेत.